MHBU070018892019

| दाखल दि. | १८.१०.२०१९ | | |
|---|---|---|---|
| नोंदणी दि. | १८.१०.२०१९ | | |
| निकाल दि. | ११.०३.२०२६ | | |
| कालावधी | ०६ वर्ष | ०४ म. | २४ दि |

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र. XXXII प्रमाणे**

**भाग –'अ'** **नि.क्र. ३१.**

(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ )

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i))

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र.०२, शेगाव, जि. बुलढाणा यांचे न्यायालयात**

**पिठासीन अधिकारी एम.के. गोटे**

(निकाल दिनांक ११.०३.२०२६)

**नियमीत फौजदारी प्रकरण क्र. २५९/२०१९**

गुन्हा क्र. २१२/२०१८ कलम २९४, ३२३, ५०४, ५०६(ii) अन्वये भारतीय दंड संहिता, १९६०, पोलीस ठाणे शेगांव ग्रामीण.

**अभियोग पक्ष**

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे, शेगांव ग्रामीण,
ता. शेगाव, जि. बुलढाणा.

**सरकार तर्फे विद्वान वकील श्रीमती ए.के.शाह.**

**आरोपी.**

विलास रामदास डोंगरे,
वयः २८ वर्षे, धंदाः शेतमजुरी,
रा. आडसुळ, ता. शेगाव, जि. बुलडाणा.

**आरोपीतर्फे विद्वान वकील श्री.बी.यु.ब्राम्हणे**

## **भाग– ब**

फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii)

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | दि. २२.०९.२०१८ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | दि. २२.०९.२०१८ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | दि. २५.०९.२०१८ |
| दोषारोप पत्र निश्चीत तारीख | दि. १८.१०.२०१९ |
| पुरावा सुरू झाला ती तारीख | दि. २४.०२.२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता ठेवले ती तारीख | दि. ११.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय देण्याची तारीख | दि. ११.०३.२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | --- |

आरोपीचा तपशिल

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोपा मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विलास रामदास डोंगरे | सुचनापत्रावर सोडले | सुचनापत्रावर सोडले | कलम २९४, ३२३, ५०४, ५०६(ii) भा.दं.वि. | निर्दोष | -- | -- |

## **भाग– क**

फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii)

अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ) अभियोग पक्षः–

| स्थान | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | भिमराव शेषराव डोंगरे | नि.क्र. २७ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | लक्ष्मी भिमराव डोंगरे | नि.क्र. ३० | साक्षीदार |

ब) बचाव पक्ष असल्यासः–

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

क) न्यायालयीन साक्षीदार असल्यासः–

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

## अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी

अ) अभियोग पक्षः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

ब) बचाव पक्षः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

क) न्यायालयीनः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

ड) भौतीक वस्तुः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

## न्यायनिर्णय

(दि. ११.०३.२०२६ रोजी घोषित)

आरोपीविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६(ii) अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे फिर्यादमधील तथ्य पुढील प्रमाणे –**

२. प्रकरणातील फिर्यादीने फिर्याद दिली की, दिनांक २२.०९.२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजेच्या दरम्यान तो बकरी चारणाराकडे घेवुन जात असतांना आरोपी त्याचे जवळ आला व म्हणाला की, पुतळा संरक्षण समिती अध्यक्ष पदाचा राजीनामा दे. त्यानंतर आरोपीने एकदम चापटा बुक्यांनी मारहाण करुन शिवीगाळ केली, तेवढयात तेथे फिर्यादीची पत्नी आली व ती आरोपीला समजावीत असतांना आरोपीने तिलासुध्दा छिनाल रांड, झवाडीचे अशी अश्लील शिवीगाळ केली. आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला खुपसुन टाकील अशी जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुध्द फिर्याद दिली.

३. फिर्यादी यांच्या वरील फिर्यादवरुन पोलीस ठाणे, शेगांव ग्रामीण येथे अपराध क्र. २१२/२०१८ नुसार आरोपीविरुध्द भा.दं.वि. कलम ३२३, २९४, ५०४, ५०६(ii) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान तपासअधिकारी यांनी घटनास्थळावर जाऊन घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले तसेच आरोपीला सुचनापत्रावर सोडुन दिले आणि तपासाअंती आरोपीविरुध्द वरील कलमांन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

४. माझे पुर्वीचे पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१४ वर भा.दं.वि. कलम ३२३, २९४, ५०४, ५०६(ii) अन्वये दोषारोप ठेवण्यात आले. त्यातील मजकुर आरोपीला त्याच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीने गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. आरोपीविरुध्द खटला चालवित असतांना गुन्ह्या संदर्भात विधाने न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपीची जबानी

नोंदविण्यात आली नाही.

५. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांचा तर आरोपीतर्फे विद्वान वकील श्री.बी.यु.ब्राम्हणे यांचा युक्तीवाद ऐकला.

६. खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझेसमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की दिनांक २२.०९.२०१८ रोजी १२.३० वाजेच्या दरम्यान ग्राम आडसुळ, ता. शेगाव, जि. बुलडाणा येथे आरोपीने फिर्यादीच्या पत्नीला, छिनाल रांड, झवाडीचे अशी अश्लील शिवीगाळ केली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम २९४ प्रमाणे गुन्हा केला ? | **.. नकारार्थी** |
| २. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला चापटा बुक्यांनी मारहाण केली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२३ प्रमाणे गुन्हा केला ? | **.. नकारार्थी** |
| ३. | वरील नमुद तारीख, वेळ, ठिकाणी आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला शिवीगाळ करुन त्यांचा जाणिवपुर्वक अपमान केला व त्याद्वारे त्याने भा.दं.वि. चे कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला ? | **.. नकारार्थी** |
| ४. | वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादी व त्याचे पत्नीला जिवे मारण्याची धमकी दिली व त्याद्वारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०६(ii) प्रमाणे गुन्हा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **..नकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **.. आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ४ करीताः–**

७. सरकार पक्षाने आरोपीविरुध्द दोषारोप सिद्ध करण्यासाठी एकुण दोन साक्षीदार तपासले. फिर्यादी सा.क्र.१ भिमराव डोंगरे यांना नि.क्र.२७, सा.क्र.२ लक्ष्मी डोंगरे हिला नि.क्र. ३० वर तपासले. फिर्यादीने आरोपी व त्यांच्यामध्ये सदरचे प्रकरण न्यायालयाबाहेर आपसात मिटले असल्याबाबत पुरसीस नि.क्र.२६ वर दाखल केली.

८. अभियोग पक्षाचे सा.क्र.१ भिमराव यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की आरोपी त्याचे नातेवाईक आहे. सन २०१९ मध्ये त्याचे व आरोपीच्या पत्नीमध्ये बोलचाल झाली होती. त्याव्यतिरीक्त काहीही घडले नव्हते. पुढे साक्षीदाराने खुलासा केला की त्याने रागाचे भरात आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली होती. तसेच पुढे असेही कथन केले की सन २०१८ मध्ये आरोपीने त्यांना व त्यांचे पत्नीला मारहाण केली नाही तसेच अश्लील शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली नाही. सदर साक्षीदारास फिर्याद व छापील एफ.आय.आर. दाखविला असता त्याने त्यावरील केवळ त्याची सही ओळखली असुन त्यातील मजकुर त्याला माहिती नसल्याचे सांगीतले.

९. फिर्यादी साक्षीदार यांनी अभीयोग पक्षास पुरक साक्ष दिली नाही. सरकारी वकीलांनी उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली तशी परवानगी दिल्यानंतर सुध्दा अभियोग पक्षाला पुरक असा पुरावा या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अभिलेखावर आलेला नाही. अभियोग पक्षाच्या कथनाप्रामणे आरोपीने फिर्यादीला मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिल्याचे अभियोग पक्षाचे सांगणे आहे. परंतु प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी हा घटनेचा महत्वाचा साक्षीदार आहे. परंतु त्याने घटनेबाबत काहीही न सांगीतल्यामुळे आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नाही.

१०. साक्षीदार क्र.२ लक्ष्मी डोंगरे ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे परंतु त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे साक्ष दिली नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान कथन केले की, फिर्यादी

तिचा पती असुन आरोपीदेखील तिचा नातेवाईक आहे. पुढे साक्षीदाराने असे कथन केले की तिच्या पतीने रागाच्या भरात फिर्याद दिली होती. तसेच सदर साक्षीदाराने असेही कथन केले की, असे काही घडले नाही की आरोपीने तिला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. सदर साक्षीदाराने काहीही न सांगीतल्यामुळे आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नाही. सदर साक्षीदारास सरकारी वकीलांनी उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली तशी परवानगी दिल्यानंतर सुध्दा अभियोग पक्षाला पुरक असा पुरावा या साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अभिलेखावर आलेला नाही.

११. सदर साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उलटतपासणीची परवाणगी मागीतली. उलटतपासा दरम्यान सा.क्र.१ यांना फिर्याद व बयाणातील अधोरेखांकीत भाग 'अ' वाचुन दाखविला. साक्षीदारांनी अधोरेखांकीत भाग खोटा असल्याचे सांगीतले. साक्षीदारांनी हे सुध्दा मान्य केले की त्यांची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झालेली आहे. फिर्यादीने सदर प्रकरण पुढे चालविणे नसल्याची पुरसीस नि.क्र.२६ वर दाखल केली.

१२. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे घटनेचे महत्वाचे साक्षीदार आहेत. परंतु त्यांनी घटनेबाबत काहीही न सांगीतल्यामुळे आरोपीविरुध्द कोणताही पुरावा आला नाही. सदर प्रकरणात असे दिसुन येते की, आरोपीची फिर्यादीसोबत आपसात तडजोड झाल्यामुळे फिर्यादी व त्याचे पत्नीने घटनेबाबत स्पष्टपणे काहीही सांगीतले नाही. फिर्यादीने आरोपीने त्याला मारहाण करुन तिच्या पत्नीला अश्लील शिवीगाळ केली तसेच त्यांना जिवे मारण्याची धमकी दिलयाबाबत स्पष्टपणे काहीही सांगीतले नसल्यामुळे आरोपीविरुध्द दोषारोप सिद्ध झाले नाही. म्हणून अभियोगपक्ष आरोपीविरुध्द दोषारोप सिद्ध करु शकलेला नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर 'नकारार्थी' देण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.५ करीताः–</u>**

१३. मुद्दा क्र.१ ते ४ च्या नकारार्थी निष्कर्षावरुन आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र

आहेत. त्याचप्रमाणे या खटल्याचे अपील झाल्यास आरोपीची उपस्थिती मा. वरिष्ठ न्यायालयात राखण्याकरीता त्यांचे कडुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे जामीन बंधपत्र घेणे योग्य होईल. करीता मुद्दा क्र.५ चे उत्तर मी खालील आदेशाप्रमाणे नोंदवित आहेः–

**आदेश**

१. आरोपी विलास रामदास डोंगरे याची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६(ii) च्या शिक्षापात्र गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे रुपये १५,०००/– चे जामीन व बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.11 17:12:22 +0530

**[श्रीमती एम. के. गोटे ]**

दि. ११.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. २, शेगाव.

मी, जी.डी.भोयटे, लघुलेखक, (न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र.२ शेगांव, ता. शेगांव, जि.बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.